REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
डालीत पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख २३ फेब्रुवारी, १९४४ अंक ८

चटण्या तयार मिळतात!
लसूणाची, अननसाची, कारळेची वगैरेची नवरत्न चटणी, मँगो चटणी इ०
(३)
हृ. ना. हेजीब.
२० शुक्रवार, पुणें.

ए. बी. सी. कॉइल्स
( डासांच्या उदबत्त्या )
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मागेरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

पुना गेस्ट हाऊस
१००, लक्ष्मी रोड, पुणें २.
Telephone
779


TELEGRAM
Guest House
Poona 2.

महागाईची जाणीव! कपड्यांच्या खर्चात काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.
गिरगांव
मुंबई नं. ४
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्यांचे व्यापारी
बुधवार
चौक,
पुणें

## जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून सन्या सोन्याचा थर चढविला जातो त्यामुळें दागिना कधींही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा थर चढविलेल्या चार बांगड्या किं: आठ रु. गॅरेजेन्स दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.


# विविध माहिती

### पुणतांबें येथील जिल्हा शेतकी प्रदर्शन

कोपरगांव तालुक्यांत पुणतांबे येथें जिल्हा शेतकी प्रदर्शन ता. १० ते १२ जानेवारी १९४४ ला मि. टॉटन, सेक्रेटरी टु गव्हर्मेंट यांचे हस्तें उघडण्यांत येऊन भरविण्यांत आलें. या प्रदर्शनांत शेतकी खातें, सहकारी खातें, आरोग्य खातें, औद्योगिक संस्था व औषधालयें यांचे स्टॉल्स होते व जनावरांचेंही प्रदर्शन होतें.

### सोसायट्यांना बक्षिसें

नगर जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डाचे शिफारसीवरून कोपरगांव तालुक्यांतील खालीं दिलेल्या दोन सोसायट्यांना बक्षिसें जाहीर करण्यांत आलीं.

१ पुणतांबें शेतकी सहकारी पतपेढी रु. २५/–
२ पोहेगांव " रु. १५/–

वरील दोन सोसायट्यांस कामकाजाचे प्रगतीबद्दल व त्यांनीं ग्रामोद्धाराचें कार्य हातीं घेतल्याबद्दल बक्षिसें मिळालीं आहेत.

### राष्ट्रीय युद्ध आघाडी

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत राष्ट्रीय युद्ध आघाडी (नॅशनल वॉरफ्रंट) वर सवेतन आणि निर्वेतन मिळून एकूण ९२,००० वक्ते प्रचारकार्य करीत आहेत. ह्या आघाडीच्या विद्यमानें दर महिन्यास सरसरीनें १५,००० सभा भरवल्या जातात आणि त्यांत भाषणें होतात.

### धान्याच्या किंमती ठरवण्यासाठी सल्लागार समिति

हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत धान्याच्या किंमती ठरवण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें एक प्रातिनिधिक स्वरूपाची सल्लागार समिती नेमली आहे. त्या सरकारचे आर्थिक सल्लागार, सर थिओडोर ग्रेगरी हे, ह्या समितीचे अध्यक्ष आहेत.

### हिंदी रेल्वेजवरील लष्करी वहातूक

हिंदुस्थानांतील रेल्वेजवर लष्करी सामानाची वहातूक युद्धपरिस्थितीमुळें अर्थातच पुष्कळ वाढली आहे. १९३८–३९ सालीं ही वहातूक सुमारें ५ लक्ष टन भरली होती, पण १९४२–४३ मध्यें सुमारें १३० लक्ष टन झाली.

### दगडी कोळशाच्या वहातुकीचें मोठें प्रमाण

दगडी कोळशाच्या खाणी हिंदुस्थानाच्या विशिष्ट भागांतच असल्यामुळें ह्या मालाची रेल्वेवरील वहातूक फार मोठ्या प्रमाणावर होऊन सबंद देशास त्याचा पुरवठा होतो. एक टन वजनाचा माल किती मैल रेल्वेचा प्रवास करतो असा हिशोब केला असतां, हिंदी रेल्वेजवरच्या वहातुकीपैकीं ४२ टक्के वहातूक दगडी कोळशाची होते असें आढळतें.

### परिमाणित (स्टॅन्डर्ड) कापड

गेल्या डिसेंबर अखेरपर्यंत ७८ कोटि वार स्टँडर्ड कापडाची मागणी हिंदी गिरण्यांकडे नोंदली होती. त्यापैकीं ४० कोटि वार कापड तयार होऊन निरनिराळ्या प्रांतांत व संस्थानांत पाठवण्यांत आलें आहे. शक्य तेथें ह्या कापडाची विक्री नेहमीच्या पद्धतीनें कापड व्यापाऱ्यांचे मार्फत करण्यांत आली असून इतरत्र सरकारनें विक्रीची स्वतः निराळी व्यवस्था केली आहे.

### युद्ध नोकरांस मुंबई सरकारच्या सवलती

युद्धासंबंधाची नोकरी करणारांसाठी मुंबई सरकारनें आपल्या नोकरींत खास जागा राखून ठेवण्याचें ठरवलें आहे. सर्व सरकारी खात्यांत रिकाम्या होणाऱ्या जागांपैकीं निम्म्या जागा ह्या रीतीनें मोकळ्या ठेवल्या जातील व वयाच्या मर्यादेचे बाबतींत युद्धकाळांतील नोकरीची मुदत हिशेबांत घेतली जाईल. अर्थात अशा रीतीनें नेमावयाच्या लोकांची युद्धनोकरी समाधानकारक ठरली असली पाहिजे आणि त्यांची आपापल्या जागांसाठीं जरूर ती लायकी असली पाहिजे.

### जर्मनीवर बॉंबहल्ल्यांचें वाढतें प्रमाण

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून १९४३ अखेर जर्मनीवर ब्रिटिश विमानांनीं एकूण २,०२,००० टन बॉंब टाकले, त्यांपैकीं एकट्या १९४३ मध्यें टाकलेल्या बॉंबचें वजन १,३६,००० टन भरलें. जर्मनव्याप्त युरोपांतील केंद्रावर टाकलेल्या बॉंबचें वजन २०,००० टन होतें. अमेरिकन विमानांनीं जर्मनीवर बॉंबफेक करण्यास ऑगस्ट १९४२ मध्यें प्रारंभ केला, तेव्हांपासून १९४३ अखेर त्यांनीं ५०,००० टन बॉंब टाकले आहेत. त्यांपैकीं २०,००० टनांचे बॉंब १९४३ मध्यें टाकण्यांत आले. जर्मनीवरील व जर्मनव्याप्त युरोपावरील ब्रिटिश विमानांच्या बॉंबफेकीची प्रगति खालीलप्रमाणें आहे:—१९३९-४० मध्यें दररोज सरासरीनें १ टन, १९४०–४१ मध्यें ५५ टन, १९४१-४२ मध्यें ९० सरासरीनें टन व १९४३ मध्यें ३७७ टन.

### प्रोड्यूसर गॅस प्लँटमुळें २ कोटि गॅलन पेट्रोलची बचत

प्रोड्यूसर गॅसवर चालणारीं सुमारें १३½ हजार वाहनें आतां हिंदुस्थानांत आहेत, त्यांत ५½ हजार बसेस, ३½ हजार लॉऱ्या व १½ हजार मोटारगाड्या ह्यांचा समावेश होतो. त्यांतील मोटारगाड्या सोडल्या तरी १२ हजार बसेस व लॉऱ्या ह्यांच्या प्रोड्यूसर गॅसवरील संचारामुळें दरसाल २ कोटी गॅलन पेट्रोलची बचत होते. एकट्या मद्रास प्रांतामध्यें ४ हजार वहानांवर प्रॉड्यूसर गॅस प्लँट बसविण्यांत आले आहेत. त्याच्या खालोखाल मुंबई व पंजाब ह्या प्रांतांचा अनुक्रम येतो. त्रावणकोर संस्थानांत प्रोड्यूसर गॅसवर चालणारीं ४ हजार वहानें आहेत. प्रोड्यूसर गॅस प्लँटची रचना अवघड किंवा गुंतागुंतीची नसली, तरी शुद्ध गॅस देणारे प्लँट नसतील तर इंजनांची तात्काळ खराबी होते. हिंदुस्थानांत सुमारें ५५ वेगवेगळ्या प्रकारचे गॅस प्लँट तयार करण्यांत येतात, त्यांपैकी सुमारें निम्म्यांची गॅस टेस्ट झालेली आहे. प्रोड्यूसर गॅस प्लँटची यशस्विता खालील गोष्टींवर अवलंबून असते:—(१) चांगला व अचुक काम देणारा प्लँट, (२) चांगला निवडक कोळसा, (३) चांगला ड्रायव्हर, (४) गॅस प्लँटची व्यवस्थित दुरुस्ती, (५) ३० मैलांपेक्षा कमी वेग ठेवणें व भरमसाट ओझें टाळणें. गॅस प्लँटसाठी १½" ते ¾" घनफळाच्या खड्यांचा, पाण्याचा अंश १०% पेक्षा कमी असलेला कोळसा सीलबंद पोत्यांतून विकतां आला, तर सोईचें होईल.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
| --- | --- |
| १ विविध माहिती | ... ५८ |
| २ सहकारी देखरेख आणि तपासणी | ... ५९ |
| ३ हिंदी बँकिंगचा गेल्या वर्षाचा आढावा | ... ६० |
| ४ स्फुट विचार | ... ६१ |
| व्हायकौंट वेव्हेल ह्यांचें भाषण— सुपरव्हिजनबाबत समिती— सहकारी संवर्धनाची योजना | |
| ५ प्रांतिक सहकारी बँकेची शाखा कमिटी | ... ६२ |
| ६ हिंदी रेल्वेजचें अंदाज़पत्रक | ... ६३ |

अर्थ

बुधवार, ता. २३ फेब्रुवारी, १९४४

## सहकारी देखरेख आणि तपासणी

प्राथमिक सहकारी संस्थांमध्यें देखरेखीचें विशेष महत्व आहे तें नीट लक्षांत येणें आवश्यक आहे. पतपेढ्यांचे हिशेब ठेवणें, त्यांच्या सभासदांच्या कर्जमागणीचा तक्ता तयार करणें, कर्जाची वसुली वेळेवर करून तीमधून बँकेचें देणें देऊन टाकणें, इत्यादि कामें संस्थेच्या सेक्रेटरीस करावयाचीं असतात. पेढ्यांच्या सभासदांमध्यें शिकलेले व जाणते लोक हिंदुस्थानच्या परिस्थितींत थोडे असल्यानें आणि हिशेबाचीं व दप्तराचीं कारकुनी कामें योग्य रीतीनें केलीं जाणें अगत्याचें असल्यामुळें पगारदार सेक्रेटरी ठेवणें अपरिहार्यच असतें. तथापि, पतपेढ्यांचें देणें-घेणें आणि नफा हीं मर्यादित असतात, आणि त्यांस लायक सेक्रेटरीचा पगार झेपत नाहीं, आणि असा मनुष्य गांवकऱ्यांमध्यें पुष्कळ वेळां मिळतहि नाहीं. तीन-चार सोसायट्यांच्या गटांत एक सेक्रेटरी नेमणें आणि त्याचेकडून ह्या पेढ्यांचीं कामें करून घेणें आवश्यक झालें आहे तें ह्यासाठीच होय. गटवार सेक्रेटरींची पद्धति समाधानकारक नाहीं असें सांगण्यांत येतें, त्यांत पुष्कळ तथ्य आहे. सोसायटीच्या गांवचा रहिवासी सेक्रेटरी नसला आणि त्यास अनेक पेढ्यांचीं कामें करावीं लागलीं म्हणजे कारभार नीट होऊं शकत नाहीं, पण गटवार सेक्रेटरींची व्यवस्था नाइलाजानें पत्करावी लागत आहे. शिकवून तयार केलेले सेक्रेटरी मिळूं शकतात, पण त्यांचा पगार देण्याची ऐपत असलेल्या सोसायट्या थोड्या आहेत. लायक, केवळ पतपेढ्यांच्या कामास वाहिलेले आणि भरपूर पगाराचे सेक्रेटरी नेमतां आल्यास सुपरव्हायजर्सच्या देखरेखीचा प्रश्न सोपा होऊन वार्षिक हिशेब तपासणीनें सोसायट्यांचें काम भागेल, आणि बँकांच्या इन्स्पेक्टरांसहि फारसें काम पडणार नाहीं. इतर कित्येक देशांत सुपरव्हायजर्स व इन्स्पेक्टर्स ह्यांची जरूरी भासत नाहीं आणि तेथें सोसायट्यांच्या युनिअनन्स असतात, त्या केवळ हिशेबतपासणी आणि सहकारी प्रगतीच्या विषयींचे प्रश्न ह्यांचेसंबंधांतच असतात. ह्याचें कारण प्राथमिक सोसायट्यांच्या स्वतंत्र कारभाराची कार्यक्षमता हेंच आहे. ह्या कामीं आमची सहकारी संघटना लंगडी आहे आणि तिच्या परिस्थितीस अनुसरूनच येथें उपाययोजना करावी लागली आहे आणि लागत आहे. तथापि, ती सुधारण्याचे मार्ग शोधून काढणें व त्यांचा अवलंब करणें अगत्याचें आहे. माल्टिपर्पज सोसायट्यांचा कारभार मोठ्या प्रमाणांत होऊन त्यांमध्यें चांगल्या पगाराचे व कुशल कामगार नेमणें शक्य आहे.

व्यक्तिशः सोसायट्यांस हिशेबाचीं, कायदेकानूंच्या अंमल बजावणीचीं, कर्जमागणीचीं वगैरें कामें वर लिहिल्याप्रमाणें स्वतंत्रपणानें व पूर्णतेनें करतां येत नाहींत म्हणून पंचवीस-तीस संस्थांच्या गटामार्फत तीं करवून घेण्याची कल्पना निघाली आणि देखरेखीच्या युनिअन्सची स्थापना झाली. विशिष्ट टापूमधील पंचवीस-तीस सोसायट्यांनीं बँकेच्या कर्जाचे फेडीची संयुक्त हमी घेतली असतां त्या सर्वांची पत वाढेल, आणि तिच्या आधारावर हलक्या व्याजानें पैसा मिळूं शकेल; तसेंच बँकेसहि इन्स्पेक्शनची दगदग व खर्च पडणार नाहीं ह्या विचारानें प्रथम परस्पर हमीच्या म्हणजे "गॅरंटिंग" यूनिअन्स स्थापल्या गेल्या. पण मुळांतच सोसायट्यांचा कारभार व्यवस्थित होण्याची तजवीज नसल्यानें ह्या प्रकारच्या गटसंस्था कार्यक्षम व यशस्वी होऊं शकल्या नाहींत. ह्या कारणानें गॅरंटिंग यूनिअन्सच्या जागीं सध्याच्या सुपरव्हायाजिंग युनिअन्स आल्या. अलीकडे शिकलेले व चांगल्या पगाराचे सुपरव्हायजर्स नेमण्यांत आले आहेत आणि आपल्या गटांतील सोसायट्यांची देखरेख व त्यांचीं बाहेरचीं कामें ते करीत आहेत. त्यांचें कार्य ज्या प्रमाणांत चोख व सर्वगामी होईल, त्या प्रमाणांत सोसायट्यांची पत वाढेल आणि त्या संस्थांस स्वस्त पैसा बाहेरून मिळेल. कर्जाबद्दलची मागणी योग्य रीतीनें व योग्य वेळीं करणें, कर्जवसुली वेळच्यावेळीं होऊन सोसायट्यांचीं पत राखणें, लवादाची, लिलावांचीं वगैरे कामें रीतसर होण्याची दक्षता बाळगणें, सेक्रेटरींच्या कारभारावर नजर ठेवणें, सभासदांस सहकाराचें शिक्षण देणें, पेढ्यांच्या ताळेबंदांची व्यवस्था पहाणें, प्रचार करणें, इत्यादि प्रकारचा कार्यक्रम पार पाडणें हें सुपरव्हायजर्सच्या कक्षेंत येतें. येथें बँकेचा प्रत्यक्ष संबंध येत नाहीं आणि सोसायट्यांच्या अंतर्गत व्यवस्थेकडे पहाणें हें तिचें स्वतःचें कामहि नाहीं. त्या संस्थांची पत कशी आहे आणि त्यांचेकडून येणारे कर्जाविषयींचें अर्ज योग्य आहेत कीं नाहीं एवढेंच तिच्या इन्स्पेक्टरांनीं पहावयाचें आहे.

देखरेख आणि इन्स्पेक्शन ह्यांच्या मर्यादा नीट ओळखल्या न गेल्याकारणानें सोसायट्या, त्यांच्या यूनिअन्स व बँका ह्यांच्या परस्पर कर्तव्यासंबंधानें गैरसमज व घोटाळा झालेला दिसतो. ह्या विषयाचें विवेचन आम्हीं गेल्या महिन्याच्या शेवटच्या अंकांत केलें होतें. ह्याबाबतींत आणखीहि एक मुद्दा विचार करण्यासारखा आहे. सोसायट्यांस लागणारें सगळें भांडवल बँकेकडून घ्यावें लागत नाहीं, त्यांचें स्वतःचें भांडवल हळुहळु वाढत असून मुंबई प्रांतांतल्या पतपेढ्यांमध्यें तें त्यांच्या एकूण खेळत्या भांडवलाच्या निम्यापर्यंत येऊन पोहोंचलें आहे. ह्या भांडवलाच्या व्यवस्थेची जबाबदारी सर्वस्वी सोसायट्या व त्यांच्या यूनिअन्सवर पडते आणि बँकेस तीमध्यें कांहींच भाग घेतां येणार नाहीं. म्हणजे बँकेच्या इन्स्पेक्टरांचें ह्यासंबंधांत कांहींच काम नाहीं. सोसायट्या, त्याचप्रमाणें, ठेवी स्वीकारून बँकेच्या मदतीवांचून आपली भांडवलाची गरज भागवूं शकतील एवढेंच नव्हें, तर त्यांनीं तसें करण्यास समर्थ होणें इष्ट आहे असें सांगण्यांत येत

आहे. ह्या मताचा आशय ध्यानांत घेणें आवश्यक आहे. सोसायट्यांची कांहीं कामें सुपरव्हायजर्स व बँकांचे इन्स्पेक्टर्स ह्यांचेकडून दुबार होतात. त्यांतली द्विरुक्ती काढून टाकण्यांत आल्यास वेळ व पैसा ह्यांची बचत होईल असें म्हणणारांच्या विचारांत कसा गोंधळ होत आहे हें वरील विचारसरणीवरून आणि माहितीवरून सहज समजून येईल. सोसायट्यांचे सर्व अंतर्गत व्यवहार त्यांचा नोकरवर्ग व यूनिअन्सचे सुपरव्हायजर्स ह्यांनीच पाहिला पाहिजे. हें त्यांचें काम आणि बँकांचें काम हीं सर्वस्वी भिन्न आहेत आणि राहिलीं पाहिजेत. असें झालें तरच सोसायट्यांचा कारभार चोख आणि कार्यक्षम होईल. सुपरव्हायजर्स आणि बँकांचे इन्स्पेक्टर्स ह्यांनीं एकमेकांचीं कामें करणें म्हणजे अव्यापारेषु व्यापार होय. त्या योगानें जबाबदाऱ्यांचा गोंधळ उडून खेडेगांवीं सहकार्याचा पाया जो प्राथमिक पतपेढी तो मक्कम होणार नाहीं आणि सबंध संघटना कच्ची राहील.

---

## हिंदी बँकिंगच्या गेल्या वर्षाचा आढावा

वेळोवेळ बदलणाऱ्या देशाच्या आर्थिक परिस्थितीचें प्रतिबिंब त्यांतील बँकांच्या व्यवहारांचे स्वरूपांत उमटलेलें पहावयास सापडणें स्वाभाविक आहे. सध्याच्या युद्धाच्या काळांत वाढता युद्ध-खर्च, चलनाचा विस्तार, महागाई, लढाऊ उपयोगाच्या जिनसांच्या उत्पादनावर भर, विविध मालाच्या किंमतींचें सरकारी नियंत्रण, पैशाची सरकारी रोख्यांत गुंतवण, वहातुकीच्या अडचणी इत्यादि बाबींचे परस्परांवर झालेले परिणाम एकंदर आर्थिक परिस्थितीच्या घटावामध्यें दिसून येतात. समाजांत चलन विपुलतेनें खेळल्यामुळें त्याचा ओघ बँकांकडे वळला. ह्याचा परिणाम, व्याजाचे दर उतरले तरी, बँकांतील ठेवींत वाढ होण्यांत झाला. ह्याचाच दुसरा परिणाम नवीन बँकिंगच्या संस्था स्थापल्या जाण्यांत झाला आणि जुन्या बँकांनीं नवीन शाखा चालू केल्या. हिंदुस्थान सरकार ब्रिटिश सरकाराच्या वतीनें ह्या देशांत युद्ध-खर्चाप्रीत्यर्थ कोट्यवधि रुपयांचा पुरवठा करीत आहे आणि त्यासाठीं रिझर्व्ह बँकेस नोटा काढाव्या लागत आहेत. १९४२ च्या डिसेंबर अखेर एकूण नोटांची किंमत ५७० कोटि रुपये होती तीं १९४३ च्या डिसेंबर अखेर ८४० कोटि रुपये झाली. युद्धाचे प्रारंभापासून नोटांमध्यें ६६८ कोटि रुपयांची वाढ झाली. ह्या मार्गानें समाजांत खेळणारा पैसा सरकारी तिजोरीकडे खेचून घेण्याचे प्रयत्न हिंदुस्थान सरकार करीत आहे आणि बाजारभावांचें नियंत्रण आदिकरून उपायहि योजण्यांत येत आहेत. सट्टेबाजी आणि महागाई ह्यांस आळा घालण्यासाठीं बँकांनीं धान्य व सोनें-चांदी ह्यांच्या तारणावर कर्जे देऊं नयेत असा निर्बंध घातला आहे.

वरील उपायांचा थोडाबहुत परिणाम होत असला तरी कांहीं वर्गांच्या हातांत किंमती चढल्यामुळें व मालाच्या तुटवड्यामुळें फाजील पैसा खेळत आहे आणि त्याचा ओघ बँकांच्या भांडवलाकडे व ठेवींकडे वळला आहे. शेड्यूल्ड बँकांच्या प्रमुख व्यवहारांच्या गेल्या तीन वर्षांच्या आकड्यांची तुलना केली असतां ह्या परिस्थितीवर चांगला प्रकाश पडतो. हे आकडे खालीं दिले आहेत:—

### शेड्यूल्ड बँकांचे मुख्य व्यवहार

(कोटि रुपये)

| | ३१-१२-४३ | ३१-१२-४२ | १-९-३९ |
|---|---|---|---|
| बिनमुदत ठेवी ... | ५०० | ३३७ | १३४ |
| मुदत ठेवी ... | ३५७ | १११ | १०२ |
| रोकड ... | २७ | १६ | ६ |
| रिझर्व्ह बँकेंत ... | ८८ | ४५ | २५ |
| कर्जे ... | १६० | ९७ | १०१ |
| हुंड्यांची खरेदी ... | ६ | २ | ३ |

वरील तक्त्यावरून असें दिसून येईल कीं युद्धाच्या प्रारंभापासून बँकांच्या ठेवी ४२१ कोटि रुपयांनीं वाढल्या आहेत. नुसत्या गेल्या सालांतला वाढावा २०९ कोटि रुपयांचा आहे आणि बिनमुदत ठेवींच्या रकमेंत तो विशेष आहे. युद्धपरिस्थितींत आपला पैसा तरता ठेवण्याची लोकांची प्रवृत्ति ह्यांवरून प्रतीत होते. बिनमुदतीच्या ठेवींचें प्रमाण वाढल्यामुळें बँकांस अधिक रोकड व तरत्या रकमा जवळ ठेवाव्या लागत आहेत. गेल्या वर्षांत रोकड ११ कोटींनीं आणि रिझर्व्ह बँकेकडील शिल्लक ४३ कोटींनीं वाढली आहे. नियमाप्रमाणें बँकांनीं रिझर्व्ह बँकेकडे विशिष्ट प्रमाणांत आपली शिल्लक ठेवावयाची असते. या मर्यादेपेक्षां ६० कोटींनीं अधिक इतकी ही रक्कम १९४३ अखेर होती. त्याच्या पूर्वीच्या वर्षी ही फाजील रक्कम २६ कोटि रुपये होती. बिन शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींमध्यें अशाच तऱ्हेची वाढ झालेली दिसून येते. ह्या बँकांमध्यें, शेड्यूल्ड बँकांच्या मानानें मुदतीच्या ठेवींचें प्रमाण अधिक आहे. शेड्यूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत गेल्या वर्षी पुष्कळ वाढ झाली. सट्टेबाजी आणि युद्धाचींतील सांपत्तिक व व्यवहार परिस्थिति ह्यास कारणीभूत झालेली आहे. सरकारी रोख्यांमध्यें बँकांनीं केलेली गुंतवणहि बरीच वाढली आहे. त्यांच्या जवळील ठेवींच्या निम्या इतकी ही गुंतवण आहे आणि एकूण सरकारी कर्जाच्या तीस टक्क्यांच्या घरांत ती गेली आहे. बँकांच्या मार्फत जनतेचा पैसा सरकारी रोख्यांत किती गुंतत आहे ह्याची यावरून कल्पना येते, गेल्या वर्षी शेड्यूल्ड बँकांनीं आपला व्यवहार नवीन शाखा स्थापून विस्तृत केला. १९४२ अखेर ह्या शाखा व कचेऱ्या एकूण १,४५० होत्या त्या १९४३ मध्यें ४१० नीं वाढून वर्षअखेर १,८६० झाल्या. नवीन १४ बँका रिझर्व्ह बँकेच्या यादीवर आल्या त्यांच्याच शाखा ११५ होत्या. सेंट्रल बँक ऑफ इंडियानें ५४ नव्या शाखा काढल्या, पंजाब नॅशनल बँकेचा आकडा ३८ होता आणि भारत बँकेनें १२९ नव्या शाखा स्थापल्या. पूर्वी शेड्यूल्ड किंवा इतर मोठ्या बँकांचा जेथें व्यवहार नव्हता अशा ५३ ठिकाणीं गेल्या वर्षी नव्यानेंच शाखा काढण्यांत आल्या.

---

### सोन्याची सरकारी विक्री

रिझर्व्ह बँकेमार्फत हिंदुस्थानच्या बाजारांत सोनें विकण्यांत आलें आहे त्याविषयीं मध्यवर्ती असेंब्लींत माहिती विचारण्यांत आली असतां ती देणें राष्ट्रीय हिताचें नाहीं ह्या मुद्यावर सरकारचे फडनवीस, सर जेरेमी रेस्मन, ह्यांनीं ती देण्याचें नाकारलें.

# स्फुट विचार

### व्हायकौंट वेव्हेल ह्यांचें भाषण

व्हाइसरॉयांच्या मध्यवर्ती कायदेमंडळाच्या संयुक्त अधिवेशनांत झालेल्या भाषणानें चालू अवघड राजकीय प्रश्न सोडवला जाण्यास सहाय होईल असा नवा मार्ग किंवा उपाय सुचवलेला नाहीं. त्यांत जपानला हिंदुस्थानच्या सरहद्दीजवळून हाकून देण्यासाठीं होणाऱ्या प्रयत्नास सर्वतोपरी सहाय देण्याचा निश्चय अग्रभागीं नमूद करण्यांत आला आहे हें योग्यच आहे. हा युद्ध-प्रयत्न यशस्वी होऊन जपानच्या पाशवी शक्तीचें निर्मूलन झाल्यावांचून ह्या देशास किंबहुना सबंद जगास शांतता, स्वास्थ्य व सुस्थिति अनुभवता येणें शक्य नाहीं असें म्हणून सदरहु उद्दिष्ट साध्य होण्यास हिंदुस्थानचे आर्थिक प्रश्न सोडवले जाण्याचें महत्त्व व्हायकौंट वेव्हेल ह्यांनीं प्रतिपादलें. ह्या प्रश्नांमध्यें त्यांनीं अन्नपुरवठ्यास पहिल्या प्रतीचें महत्त्व दिलें आणि त्याबाबतींतलें मध्यवर्ती सरकारचें धोरण विशद केलें. धान्याच्या पैदाशींत वाढ, व्यापाऱ्यांच्या नफेबाजीचें व किंमतीचें नियंत्रण, शेतकरी व इतर जनता ह्यांस सोयीचें होईल असें बाजारभावांचें प्रभावी नियमन आणि ह्या सर्व संबंधांत प्रांतिक व संस्थानी सरकारांचें सहकार्य इत्यादि प्रमुख मुद्दे त्यांनीं पुढें मांडले. युद्धकाळांत आणि त्याचे समाप्तीनंतर हिंदुस्थानांत अन्नपुरवठा वाढवण्याच्या प्रश्नाकडे विशेष लक्ष पुरवण्यांत आलें पाहिजे आणि ह्यासाठीं शेतीचा विस्तार व तिच्या उत्पादनेंत सुधारणा घडवून आणण्याच्या महत्त्वावर त्यांनीं जोर दिला. बंगालमधील दुष्काळाची आपत्ति बरीच आटोक्यांत आली आहे आणि धान्याची देशांतील पैदास व त्याची होणारी आयात ह्यांचे योगानें मागणी व पुरवठा ह्यांची तोंडमिळवणी होऊं शकेल अशी आशा व्हाइसरॉयांनीं प्रकट केली. चलनाच्या विस्ताराचा बाजारभावांवर होणारा परिणाम हा विषय आपल्या सरकाराचे फडनवीस अंदाजपत्रकावरील स्वतःच्या भाषणांत हाताळतील असें म्हणून त्यांनीं हा प्रश्न तसाच सोडून दिला. आर्थिक पुनर्घटनेचाहि त्यांनीं उल्लेख केला. देशाच्या आर्थिक उन्नतीच्या दृष्टीनें हिंदुस्थानास एकजिनसी राज्यव्यवस्था व धोरण आवश्यक असल्याचें त्यांनीं सांगितलें आणि उदाहरणें देऊन त्याची शक्यता व इष्टता प्रतिपादली.

---

### सुपरव्हिजनबाबत समिति

प्रांतिक सहकारी बँकांच्या असोसिएशनच्या मध्यवर्ती बँकांच्या विभागाची एक सभा अलीकडे भरून आजच्या अग्रलेखांत चर्चिलेल्या विषयाचा तीमध्यें विचार झाला. सभेपुढें सुपरव्हायाजिंग युनिअन्सना बँकांनीं नेहमीपेक्षां पांच हजार रुपयांची जादा भेंट देऊन त्यांच्या खर्चांतली तूट भरून काढण्यास मदत करावी अशी रजिस्ट्रार ह्यांची सूचना होती आणि तिच्या मुळाशीं सुपरव्हिजन व इंस्पेक्शन ह्यांच्या परस्पर संबंधाचा महत्त्वाचा प्रश्न होता. सुपरव्हायझर्सना मिळणारा महागाईभत्ता अपुरा असल्यानें त्यांत वाढ करणें आवश्यक होतें, पण युनिअन बोर्डांच्या उत्पन्नांत कूस नसल्यामुळें बँकांची जादा मदत मागण्यांत आली होती. युनिअन्सच्या उत्पन्नास सरकारनें नेहमीपेक्षां अधिक भेंट देऊन हातभार लावला होता. पण तीमध्यें आणखी वाढावा करण्याची त्याची तयारी नव्हती. युनिअन्सची सांपत्तिक स्थिति असमाधानकारक असून ती सुधारण्याची आवश्यकता आहे आणि त्याप्रमाणें सुपरव्हायजर्सना जादा भत्ता मिळणें अगत्याचें आहे ह्याविषयीं मतभेद नव्हता असें असलें तरी बँकांनीं युनिअन्सना जादा भेंट कां द्यावी आणि ह्या बाबतींत जबाबदारी कां टाकण्यांत यावी हा तत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला. बँकांच्या इंस्पेक्टर्सनीं करावयाचीं कांहीं कामें युनिअन्सचे सुपरव्हायझर्स करीत असल्यानें आणि विशेषतः कर्जवसुलीमध्यें त्यांची महत्त्वाची मदत होत असल्यानें बँकांनीं आपली भेंट वाढवणें न्याय्य आहे असा एक मुद्दा उपस्थित करण्यांत आला होता. तसेंच, इन्स्पेक्टर्स व सुपरव्हायझर्स ह्यांच्या कामाची नीट जुळणी झाल्यास खर्चांत काटकसर होऊन बँकांस आपली युनिअन्सची भेंट वाढवणें शक्य होईल असाहि कोटिक्रम करण्यांत आला. सहकारी अधिकारी व बँकांचे प्रतिनिधी ह्यांनीं ह्या विषयाबाबत आपलीं मतें स्पष्टपणानें पुढें मांडल्यावर असोसिएशनच्या वर उल्लेखिलेल्या सभेंत प्रस्तुत प्रश्नाची विशेष छाननी करण्यासाठीं एक लहान समिति नेमण्यांत आली. हा निकाल निःसंशय समाधानकारक आहे. यूनिअन सुपरव्हायजर्स व बँक इंस्पेक्टर्स ह्यांचीं कामें मूलतःच भिन्न असल्यानें तीं ह्या किंवा त्या अधिकाऱ्यांच्या हातीं एकवटतां येणें शक्य नाहीं असा सामान्यतः सभेचा अभिप्राय दिसून आला. सहकारी अधिकाऱ्यांनीं सुचवल्याप्रमाणें वरील अधिकाऱ्यांच्या कामाची निराळ्या रीतीनें वाटणी केली तरी देखरेखीच्या खर्चांत बचत म्हणण्यासारखी व्हावयाची नाहीं असें सर्वसाधारण मत आढळून आलें, तरीहि प्रस्तुत सबंद प्रश्नाची चौकशी केल्यानें कांहीं बिघडत नाहीं ह्या समजुतीनें त्याचा अखेरचा निकाल समितीच्या शिफारसीवर अवलंबून ठेवला आहे.

---

### सहकारी संवर्धनाची योजना

युद्धोत्तर काळांत व्हावयाच्या आर्थिक पुनर्घटनेंत सहकारी संघटनेचें स्थान कोणतें असावें ह्यासंबंधानें विचार केला जाण्याची आवश्यकता आम्हीं प्रतिपादली आहेच. पुनर्घटनेच्या इष्टतेविषयीं कोठेंच वाद नाहीं. सरकार, धंदेवाले व सामान्य जनता ह्यांची त्या बाबत एकवाक्यता आहे. शेती, उद्योगधंदे, व्यापार, वहातुकीचीं साधनें ह्या सर्वांचे संबंधांत संवर्धनाचें कार्य योजनात्मक पद्धतीनें करावें लागणार आहे आणि सहकारी संघटनेचा उपयोग ह्या कार्यक्रमांत केला जाणें अगत्याचें आहे. शिक्षण, वहातुकीचीं साधनें, सार्वजनिक आरोग्य, ह्यांच्या अभिवृद्धीसाठीं कोट्यवधि रुपये खर्चावे लागतील. सर्व प्रांतिक खात्यांचें कार्यक्षेत्र वाढणें आणि त्यांवर अधिकाधिक पैसा खर्चला जाणें अपरिहार्य आहे. अभिवृद्धीच्या ह्या कार्यक्रमांत सहकारी चळवळीप्रीत्यर्थ मुंबई सरकारानें अधिक पैसा खर्च केला पाहिजे. ह्यासंबंधांत सहकारी योजना सरकार व सहकारी कार्यकर्ते यांनीं तयार करणें अगत्याचें आहे, प्रॉव्हिन्शल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटनें हा प्रश्न हातीं घेतला असून त्यासाठीं योजना तयार करण्याची व्यवस्था चालवली आहे असें समजतें. योजना बनवली जाण्यास मुंबई सरकारची संमती असून इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें तें कार्य लवकरच चालू व्हावयाचें आहे ही समाधानाची गोष्ट आहे. ह्याकरितां मोठी कमिटी आणि विस्तृत चौकशी ह्यांची आवश्यकता नाहीं. रजिस्ट्रार आणि इन्स्टिट्यूटचे व प्रांतिक बँकेचे अध्यक्ष ह्यांस सहकारी संस्थांचीं मतें गोळा करून सहकारी चळवळीचे प्रश्न सोडवण्याचे मार्ग सुचवतां येतील. ह्या प्रकारच्या समितीचें कार्य लवकर चालू होऊन सहकारी कार्यकर्ते तिच्यापुढें आपलीं मतें व कल्पना मांडतील अशी आशा आहे.

## मुंबई प्रांतिक सहकारी बँकेची नाशिक शाखा कमिटी

बँकेचे अध्यक्ष, श्री. आर. जी. सरय्या, ह्यांचें भाषण

नाशिक हें यात्रेचें व पावित्र्याचें ठिकाण आहे पण व्यापारी दृष्ट्या तें पुढारलेलें नाहीं. मुसार मालाकरितां लासलगांव व कापूस-भुइमुगाकरितां मालेगांव हीं ह्या जिल्ह्यांत प्रामुख्यानें व्यापारी केंद्रें आहेत. परंतु सटाणा, सिन्नर, चोटी ह्यांही पेठा आतां पुढें येत आहेत व नाशिकही त्यांच्या मागोमाग व बरोबरीनें जमत आहे ह्यामुळें व्यापारी व सहकारी बँकांची जरूरी आहे. करितां आपली येथील शाखा भरभराटीस येईल ह्याविषयीं मला मुळींच शंका वाटत नाहीं.

येथें जिल्हा सहकारी बँक होती, परंतु १९३० पासून जी शेतकी धान्यांची मंदी सुरू झाली तिचा परिणाम शेतकी पतपेढ्यांवर बराच वाईट झाला व बऱ्याच सोसायट्या डबघाईस आल्या. त्याचा सहाजिक परिणाम त्यांची जिल्हा बँक तितकीशी जुनी नसल्यामुळें व स्वतःचे रिझर्व्ह बळकट करण्यास पुरेसा अवधी न मिळाल्यामुळें त्या बँकेवर झाला व तिला आपलें काम बंद करणें जरूर पडलें. शेतकरी हा आपला धंदा कर्ज घेतल्याशिवाय करूं शकत नाहीं, तशांत शेतकी धंदाला मंदी आली होती. कर्ज फेडल्यावर परत कर्ज मिळूं शकत नाहीं, असें झाल्यावर वसुलीवर त्याचा बराच अनिष्ट परिणाम झाला. सरकारनें तगावी कर्ज देण्याची योजना मंजूर केली. परंतु त्याच्या अटी सभासदाला मान्य करणें जड जाऊं लागलें, इतकेंच नव्हे तर तें कर्ज खर्चाच्या दृष्टीनें महाग पडून वेळेवर मिळणेंही मुष्किलीचें झालें. सभासदांना व्याजाच्या मुबलक सवलती देऊनही, परत कर्ज देण्याच्या सुलभतेच्या अभावीं पतपेढ्यांचे पुनर्जीवन करणें मुष्किलीचें भासूं लागलें. त्यामुळें कांहीं ठिकाणीं नाशिक बँकेची बाकी देऊन टाकून सोसायट्यांचे सर्व संबंध आमच्या बँकेनें आपल्याशीं जोडून घेतले, तर कांहीं सोसायट्यांच्या व्यक्तिशः सभासदांची ऐपत व वागणूक बरोबर असल्यास त्यांसच कर्ज देण्याकरितां म्हणून डबघाईस आलेल्या सोसायट्यांसही कर्ज देण्यास मान्यता दिली. ह्याप्रमाणें दिलेल्या कर्जाची रक्कम जरी फार नसली तरी हें आश्वासन सोसायट्या वरती आणण्यास बरेंच उपयोगीं पडलें व पडत आहे असें म्हणण्यास मला खात्री वाटत आहे. नाशिक बँकेच्या ७५ सोसायट्यांपैकीं पहिल्या वर्षी १४ सोसायट्या वरील धोरणास अनुसरून वर्ग करण्यांत आल्या व आतां त्यांची संख्या ३१ आहे. सर्वसाधारण माहितीवरून असें कळतें कीं, आतां मोडावयास लागणाऱ्या सोसायट्यांची संख्या हाताच्या बोटांपेक्षां जास्त राहूं शकणार नाहीं व हा भाग २-४ वर्षांत, हल्लीप्रमाणें सुधारत राहिल्यास, खात्रीनें पूर्ण सुधारेल.

### शाखा कमिटी—तिचीं कामें व अधिकार

ही सुधारणा घडण्यास स्थानिक पुढाऱ्यांची मदत असणें अत्यावश्यक आहे. येथील सुपरवायझिंग युनियन्स हींही तहकुबींत (Under suspension) आहेत. नाशिक बँकेकडून वर्ग केलेल्या सोसायट्या मालेगांव शाखेला जोडल्या होत्या म्हणून स्थानिक सहकारी पुढाऱ्यांची मदत मिळूं शकत नसे. ह्या सर्व गोष्टींमुळें नाशिक येथें ह्या बँकेची शाखा उघडावी अशी मागणी झाली व त्यास मान देऊन ९-११-४३ रोजी येथील शाखा उघडली. वास्तविक नाशिक तालुक्यांत सोसायट्या फारच थोड्या आहेत व त्या दृष्टीनें नाशिक हें ठिकाण कांहीं तितकेसें बरोबर नाहीं व शाखाही तोट्यांतच चालण्याचा संभव होता. परंतु आतां नवीन सोसायट्या—कंझुमर्स स्टोअर्स, भाजीपाला सोसायट्या वगैरे—निघत आहेत. त्याचप्रमाणें निफाड भाग हाही, बागाईत भाग असल्यामुळें तेथेंही बराच वाव आहे. ह्या भागांत कांहे बरेच पिकत असल्यामुळें कांद्रे स्टोअर्सही होणें आहेत. अशा वेळीं स्थानिक पुढाऱ्यांचें सहकार्य, वाईट सोसायट्या सुधारण्यास व नवीन नाना प्रकारच्या सोसायट्या काढून हा भाग सहकारी दृष्ट्या पुढें आणण्यास, फारच जरूरीचें आहे. शिवाय ह्या भागांतील अडचणी वरचेवर कळणें शक्य झाल्यास त्या दूर करणें सुलभ होईल. त्याचप्रमाणें येथील व्यवहार शक्य तितका स्थानिक पुढाऱ्यांच्या मदतीनें करणें इष्ट व फायदेशीर होय. ह्याकरितां येथें एक शाखा कमिटी स्थापन करण्याची आवश्यकता माझ्या बोर्डास वाटत आहे व ती आपण निवडून द्यावी ही विनंती आहे.

ह्या कमिटीचीं कामें व अधिकार आज आपल्यापुढें स्वीकारण्याकरितां जे पोट नियम ठेवण्यांत येणार आहेत त्यांत समाविष्ट केलेले आहेतच. पण थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास ते खालीलप्रमाणें आहेत:—

(१) बँकेच्या बोर्डावर संलग्न सोसायट्यांतर्फे डायरेक्टरांची निवड करणें.

(२) सोसायट्यांस कर्ज तहकुबी वगैरेसंबंधीं बँकेचें बोर्ड अधिकार देईल त्याप्रमाणें व त्यास अनुसरून मंजूर करणें अगर शिफारस करणें.

(३) शाखेची शिल्लक तपासणें, कर्ज नोंद व शाखेनें घेतलेले कर्ज रोखे पहाणें, सरकारी तपासणी यादी, इन्स्पेक्शन याद्या पाहाणें व त्याबद्दल विचार करणें, हुंडी लिमिट्स, माल तारण, कर्जाच्या मर्यादा, ठेवीदारांचा वारस वगैरेसंबंधीं हेड ऑफिसकडे शिफारस करणें.

(४) वाईट व स्थगित सोसायट्या सुधारण्याकरितां इन्स्पेक्टर्सना वेळोवेळीं सूचना देणें व मदत करणें व जरूर तेथें स्वतः भेट देणें.

(५) शाखेच्या क्षेत्रांत सुधारणा व प्रगति होण्यासाठीं मार्ग सुचविणें. सोसायट्यांच्या तक्रारी असल्यास त्या बँकेकडे कळवून दाद लावून घेणें.

(६) बँकेच्या बोर्डानें मंजूर केलेल्या ग्रँटप्रमाणें कमिटीचा खर्च करणें व व्यवहार चालविणें.

(७) वार्षिक सर्व साधारण सभेकरितां कमिटीचा व शाखेचा अहवाल तयार करणें.

(८) शेतीची सुधारणा निरनिराळ्या गांवीं कशी करतां येईल व ती करण्यास कसें उत्तेजन बँकेनें द्यावें ह्याबद्दल शिफारस करणें.

(९) आर्थिक बाबतींत सोसायट्यांना सूचना व सल्ला देणें व सभासदांस सहकारी पैशापासून स्वतःचा फायदा कसा जास्त होतो व तो कोणत्या रीतीनें करून घेतां येईल ह्याचें ज्ञान व समजूत देणें. शक्य झाल्यास ही कमिटी सोसायट्यांवर सुपरवायझिंग युनियन्सचे अभावीं देखरेखीचेंही काम हातीं घेऊं शकेल अशी आशा आहे.

हल्लीं शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची किंमत जरा योग्य व किफायतशीर मिळत आहे. पैसा मिळवणें हें जरी कठीण असलें

तरी तो राखून ठेवणें त्याहीपेक्षां कठीण आहे. हल्लीं झालेला फायदा जर बरोबर राखून ठेविला नाहीं तर लढाईनंतर शेतकऱ्यास परत पश्चात्ताप करावा लागेल. हल्ली जमिनीच्या किंमती वाढल्या आहेत; त्याचप्रमाणें सोन्या-चांदीच्या किंमतीही जबर झाल्या आहेत. तरी ह्या गोष्टींत पैसा गुंतवल्यास तो जेव्हां परत लागेल त्यावेळीं जमीन व सोनें-चांदी विकून उभारावा लागेल परंतु त्यांच्या किंमती उतरल्यामुळें ह्या पैशांत तूट येईल. म्हणून पैसा रोखीनें शिल्लक ठेवणें जरूर आहे. परंतु रोख पैसा जवळ ठेवणें शेतकऱ्यास तेवढेंच जमत नाहीं. म्हणून हा पैसा ठेव म्हणून सोसायट्यांत त्यांनीं ठेवावा म्हणजे सभासदांस व्याजरूपानें थोडीशी कमाई होऊन मुद्दलांत घट होणार नाहीं, इतकेंच नव्हे तर आपल्या सहकारी सभासदांसही त्यामुळें मदत केल्याचें श्रेय येईल. तरी ह्या सूचनेचा सर्वांनीं विचार करून फायदा घ्यावा ही विनंती आहे.

## रेल्वे प्रवासाच्या दरांत वाढ

गेल्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपासून रेलवे प्रवाशांच्या तिकिटांवर २५ टक्के अधिक घेतले जाणार असें सर एडवर्ड बेंथॉल ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत रेलवेजचें १९४४-४५ चें आपलें अंदाजपत्रक पुढें मांडतांना सांगितलें. सर्व वर्गांच्या रेल्वे प्रवाशांच्या तिकिटांचे दरांत एवढी मोठी वाढ एकदम करण्याच्या ह्या योजनेवर कडक टीका सर्वत्र होत असल्यास त्यांत नवल नाहीं. चलनवृद्धीमुळें होणाऱ्या महागाईस आळा घालण्याचा आणि रेलवेवर पडत असलेला ताण कमी करण्याचा हा उपाय आहे असें ह्या दरवाढीचें समर्थन सर एडवर्ड ह्यांनीं केलें आहे. दरवाढीची कडू गोळी शर्करावगुंठित करण्यासाठी त्यांनीं असें सांगितलें आहे कीं, वाढाव्यामुळें होणारें जादा उत्पन्न सरकारच्या मामुली उत्पन्नांत जमा केलें जाणार नसून त्याचा स्वतंत्र फंड बाजूस काढून ठेवण्यांत येईल आणि त्याचा विनियोग युद्धोत्तर काळांत तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांच्या सुखसोयी वाढवण्याकडे केला जाईल. ह्या शेवटच्या आश्वासनानें कोणाचेंहि समाधान झालेलें नाहीं आणि होईल असें वाटत नाहीं. तिसऱ्या वर्गाच्या सोयींची व्यवस्था अपुरी असल्याची आणि त्यांची कुचंबणा होत असल्याची तक्रार जुनी आहे. ती दूर होण्याची आशा युद्धपरिस्थितींत नाहीं आणि पुढें व्हावयाच्या सुधारणेच्या आश्वासनाचा आज उपयोग नाहीं ही साधी गोष्ट सर एडवर्ड ह्यांच्या लक्षांत यावयास हवी होती. रेल्वेनें प्रवास करणाऱ्या जनतेचे हाल सध्या कसे होत आहेत ह्याची कल्पना त्यांस असावी असें दिसत नाहीं. युद्धकाळांत लष्करी वहातुकीची वाढ होणें, सामान्य लोकांच्या उपयोगाच्या आगगाड्यांची संख्या कमी होणें आणि प्रवाशांस गैरसोय सोसावी लागणें अपरिहार्य आहे, हें समजण्यासारखें आहे. पण रेलवेनें प्रवास करणाऱ्या जनतेची विलक्षण गैरसोय एकाबाजूनें चालली असतां तीस जादा पंचवीस टक्क्यांचा भार सोसावयास लावणें समर्थनीय नाहीं. रेलवेजवरचा ताण कमी करण्याचे दुसरे मार्ग सरकारनें शोधावयास हवे होते. सध्याच्या स्थितींत केवळ चैनीखातर प्रवास करणारांची संख्या म्हणण्यासारखी आहे असें मानण्यास जागा नाहीं. युद्धपरिस्थितीमुळेंच वाढता रेलवेप्रवास आवश्यक झाला आहे, हा मुद्दा येथें सर एडवर्ड ह्यांनीं ध्यानांत घ्यावयास पाहिजे होता. पंचवीस टक्क्यांची रेलवेदरांत वाढ हा चलनवृद्धीचें नियमन करण्याचा एक उपाय म्हणून सुचवतांना रेल्वेप्रवासाच्या सध्याच्या एकंदर परिस्थितीचा विचार त्यांनीं केला असता तर आपल्या ह्या सूचनेचा अनिष्टपणा त्यांस पटला असता. रेल्वेप्रवास अगोदरच जाचक झालेला सुधारण्याचा प्रयत्न करण्याचें अभिवचन देण्याऐवजी सर एडवर्ड ह्यांनीं तोहि प्रवास अधिक खर्चाचा होईल अशा प्रकारची दरवाढीची सूचना केल्यामुळें असेंब्लीमध्यें तिला सर्व लोकप्रतिनिधींचा जोराचा विरोध झाल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. सरकारनें आपल्या धोरणाचा फेरविचार करून लोकमतास मान देणें आवश्यक आहे.


# दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

**बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें**

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

**—ठेवी घेणें आहेत—**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मुदत | ६ | महिने | दर ४ | टक्के |
| | १२ | ” | ४॥ | ” |
| | २४ | ” | ५ | ” |

**माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.**

# बॉम्बे को-ऑपरेटीव इन्शुअरन्स सोसायटी लिं.

**सहकारी संस्थांच्या सभासदांस विशेष सवलत**

| | | |
|---|---|---|
| एकंदर कामकाज | ... | १। कोटीहून अधिक |
| एकूण मालमत्ता | ... | १८ लाखांहून अधिक |
| आयुर्विमा फंड | ... | १६ लाखांहून अधिक |

एजन्सीच्या अटी अगर पॉलिसीच्या विशेष माहितीकरितां चौकशी करा:—

मुख्य ऑफिस:—

**को-ऑपरेटीव इन्शुअरन्स बिल्डिंग,**

सर फिरोजशहा मेथा रोड, कोट, मुंबई.

**हिंदुस्थानच्या आघाडीवरील सहकारी विमा संस्था**

खळाळणारी हास्याची सळसळ पिकविणारा, खमंग, खुसखुशीत, खुमासदार विनोदाचा
दिलखुष नमुना
पहावयाचा असेल तर
पनघटच पाहिला पाहिजे
शनिवार ता. १९ पासून—
३ रा आठवडा
प्रकाश पिक्चर्सचा मनोरंजक बोलपट
# पनघट
— एव्हरग्रीन रिलीज —
—: भूमिका :—
रत्नमाला, उमाकांत, जीवन
—ग्लोब फोन ६९१ पुणें—
दररोज ६॥ व १० वाजतां
शनि. रवि. सोम. दुपारीं ३॥ वाजतां जादा खेळ.
दररोज सकाळीं १० ते १२ व दुपारीं ४ चे पुढें ग्लोबमध्यें वरच्या दराचीं तिकिटें रिझर्व्ह केलीं जातील

धर्मवीर डॉ. मुंजे
यांनीं प्रशंसिलेला प्रकाशचा
— प्रचंड बोलपट —
१७ वा आठवडा
प्रकाश पिक्चर्सचा
पौराणिक मराठी बोलपट
# रामराज्य
दिग्दर्शक :—विजय भट्ट.
—: भूमिका :—
शोभना समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी
मिनर्व्हा, पुणें
रोज फक्त दोन खेळ
६। व १० वाजतां
दर शनि. रवि. सोम. व इतर सुटींचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां
[ एव्हरग्रीन—रिलीज ]

सणसणीत संवादाच्या, दणदणीत
बोलपटांच्या सप्ताहांचें दशक !
शकुनीचें कारस्थान ! भगवंतांस अटक करण्याचा डाव फसला !!
१० वा आठवडा !
रॉयल रत्न १८ वें
# महात्मा विदुर
पायनीस, दुर्गा खोटे यांची एकत्र भूमिका असलेला भक्त—पट !
दररोज तीन खेळ दुपारीं ३।, ६॥ व १० वाजतां.
दर रविवारीं सकाळीं जादा खेळ १० वाजतां
आर्यन, पुणें

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.